FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

0154192

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ना.म.पा.वि, पहिली खबर क्र. FIR No. 33, वर्ष Year 2022, दिनांक Date 03/08/22

2. (i) अधिनियम Act म.प्र.अ. 9CLL, कलमे Sections (B)
(ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
(iii) इतर अधिनियम व कलने Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ..........., तारीख पासून Date from 4/7/22, वेळ Time ..........., तारीख पर्यंत Date to 2/8/22, वेळ Time 16:08
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 01/08/2022, वेळ Time ...........
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 09, तारीख Date 03/08/22 वेळ Time 2.30

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. दक्षिण 0 कि.मी., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. L 6
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name बी वार्ड, म.न.पा. ठिकाणाचे नंबर No. if any बृहन्मुंबई, जे.जे. मार्ग गल्ली Ward जे.जे. मार्ग रस्त्याचे नाव Name of road हॉस्पीटल समोर मुंबई.
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..........., गाव Village ..........., पोस्ट Post ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ...........
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ...........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name अविनाश उर्फ अशोक उर्फ शॅकेल न्युनस (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name ...........
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 38 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9819375153
(e) पारपत्र क्रमांक Passport No. T.4719829, दिल्याचा दिनांक Date of Issue 3/4/19 दिल्याचे ठिकाण Place of Issue मुंबई (f) व्यवसाय Occupation नोकरी
(g) धर्म Religion ..........., जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
(h) पत्ता Address : ..........., गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ...........
रस्त्याचे नाव Road EDCEL बंगलो जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place प्रभियन पार्क, गाव Village भवानी अपार्टमेंट जवळ पोस्ट Post पो. स्टे. P. Stn. खार (प) मुं. 52
तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ..........., सध्याचा पत्ता Present Address ...........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

देविदास गोविंद कोळी, वय-57 वर्षे, हुद्दा अभिलेख सहाय्यक (PBR) बी वार्ड, म.न.पा., बृहन्मुंबई, जे.जे.मार्ग हॉस्पीटल समोर, जे.जे. मार्ग मुंबई
राहणार - म.३रा. गोरा कोळीवाडा, हनुमान मंदिर जवळ, पिन : 202013

फिर्यादी श्री अविनाश उर्फ आकाश उर्फ गॅब्रेल न्युनस यांचा जबाब हा स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केला असुन त्यास प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधिण्यात येत आहे.

समक्ष
(सही)
(नाना सुर्यवंशी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(सही)
(Avinash Nunes)
3rd Aug 2022

जबाब दिनांक ०२.०८.२०२२

श्री. अविनाश उर्फे अशोक उर्फे गॅब्रल न्युनस वय ३८ वर्षे, धंदा : खाजगी नोकरी, रा. ई. डी. सी. एल बंगलो, प्लॉट क्र. १६२०, युनियन पार्क, भावनी आपर्टमेंट जवळ, खार (प), मुंबई ४०००५२ मो. क्र. ९८१९३७५१५३

---

मी वरील प्रमाणे असुन, वर नमुद पत्त्यावर माझ्या जन्मापासुन रहावयास आहे. माझे राहते घरी माझी आई ॲगनिस व मी रहावयास आहे. मी एका चॉईस इन्शुरन्स कंपनीत, जे. बी नगर, अंधेरी येथे ब्रोकर म्हणुन काम करतो त्यावर मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझ्या आईचा उदरनिर्वाह चालतो.

माझ्या राहत्या घराच्या कंम्पाऊडमध्ये बोअरवेल करायची असल्याने मी दिनांक १०.०६.२०२२ रोजी महानगरपालिका, एच/पश्चिम वार्ड, सांताक्रुझ, मुंबई येथे परवानगी प्राप्त करण्याकरीता अर्ज केला होता. त्यानंतर मी सदर विभागास जावुन अर्जाबाबत चौकशी केली असता, तेथील क्लार्कने मला माझी फाईल वॉटर विभागास गेली असल्याचे सांगितले. त्यानंतर वॉटर विभागास जावुन श्री. संतोष पिल्ले यांच्याकडे माझ्या अर्जाबाबत चौकशी केली असता, त्यांनी माझा अर्ज पी ॲन्ड आर (नियोजन व संशोधन विभाग), बी वार्ड, म.न.पा बृहन्मुंबई, जे. जे. मार्ग, मुंबई येथे पाठविली असल्याचे सांगितले.

दिनांक २४.०६.२०२२ रोजी म.न.पा, बुहन्मुंबई, बी वार्ड, नियोजन आणि संशोधन विभाग (पी ॲन्ड आर), जे. जे. मार्ग, जे. जे. हॉस्पिटल समोर, मुंबई येथील डी. जी. कोळी यांनी त्यांच्या मोबाईल क्र. ७०३९२६७८५८ वरुन माझ्या मोबाईल क्र. ९८१९३७५१५३ वर फोन करुन ''आपका फाईल मेरे टेबल पे आया है'' असे बोलुन त्यांने मला त्यांच्या कार्यालयास भेटावयास बोलवले.

त्यांनतर मी दिनांक २८.०६.२०२२ रोजी मी डी. जी कोळी यांना त्यांच्या मोबाईलवर फोन करुन माझ्या फाईल बाबत विचारुन तुम्ही तपासणी करण्याकरीता येणार आहात का याबाबत विचारणा केली असता, डि. जी कोळी यांनी फोनवर बोलु शकत नाही तुम्ही चर्चा करण्याकरीता कार्यालयास या असे सागितले.

त्यांनतर दिनांक ३०.०६.२०२२ रोजी डी. जी कोळी यांनी माझ्या मोबाईल फोनवर कॉल करुन कार्यालयास कधी येणार आहेस याबाबत विचारणा करुन माझे कामाची फाईल मंजुरी करण्यासाठी काहीतरी मोबदला दयावा लागेल असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना कार्यालयास येवुन भेटतो असे सांगितले.

दिनांक ०४.०७.२०२२ रोजी मी डी. जी कोळी यांना त्यांच्या कार्यालयात जावुन भेट घेवुन माझे फाईलबाबत विचारणा केली असता, डी. जी कोळी यांनी मला फाईल तयार झाली आहे. त्यावर मोठया साहेबांची सही घेवुन आता देवु शकतो पण साहेब नाही आहे. त्यामुळे दोन ते तीन दिवस थांबावे लागेल असे सांगुन कोळी हे मला मोठया साहेबांच्या कॅबिनमध्ये घेवुन गेलेत पण त्यादिवशी साहेब नव्हते. त्यावेळी कोळी यांनी मला परवानगी फाईल मंजुर करण्यासाठी काही दयावे लागेल असे सांगितले. त्यावेळेस मी आता माझेकडे काही नाही व किती दयावे लागेल असे कोळी यांना विचारणा केली असता, कोळी यांनी मला रु. ५०००/— रक्कम दयावी लागेल असे सांगितले.

त्यानंतर दिनांक ०७.०७.२०२२ रोजी डी. जी कोळी यांनी मला माझे मोबाईल वर फोन करुन माझी परवानगीची फाईल मंजुर झाली असल्याचे सांगुन येताना पाच हजार रुपये घेवुन येण्याचे सांगितले.

श्री. देविदास गोविंद कोळी, अभिलेख सहाय्यक, म. न. पा. बृहन्मुंबई, बी वार्ड, (नियोजन व संशोधन विभाग), जे. जे. मार्ग, जे. जे. हॉस्पिटल समोर, मुंबई यांनी माझेकडे रुपये ५,०००/— मिळण्याबाबत तगादा लावला होता.

समक्ष
[signature]
(नाना सुर्यवंशी)
पो नि ACB MUMBAI)

[signature]

मला श्री. देविदास गोविंद कोळी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक ०१.०८.२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार करण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे मी दिनांक ०१.०८.२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमक्ष हजर राहिलो. त्यावेळी वरिष्ठानी सांगितल्याप्रमाणे पो. नि. सुर्यवंशी यांचेकडे रेकॉर्ड असिस्टंट श्री. देविदास कोळी यांचेविरुध्द स्व:हस्ताक्षरात इंग्रजीमध्ये तक्रार लिहुन दिली. पो. नि. सुर्यवंशी यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन दिनांक ०२.०८.२०२२ रोजी मी दिलेल्या तक्रारीवर दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

दिनांक ०२.०८.२०२२ रोजी पो.नि. सुर्यवंशी यांनी माझी व अंमलदार यांची ओळख करुन दिली. त्यानंतर पो.नि. सुर्यवंशी हे मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. सुर्यवंशी यांनी स्वत:चे, माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले. त्यानंतर मी, पंच, पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार असे शासकीय वाहनाने वरळी लाचलुचपत कार्यालय येथून पडताळणीसाठी १२.४५ वा. रवाना होवून जे. जे हॉस्पिटल येथील कंम्पाऊड मध्ये थांबलो. मला व पंच श्री प्रशांत बांगर यांना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत योग्य त्या सुचना तपासी अधिकारी व स. पो. आ. देशमुख यांनी दिल्या. तेथे पो.नि सुर्यवंशी यांनी माझे शर्टचे आतील बाजूस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून लावला. त्यानंतर मी व पंच बांगर असे लोकसेवक श्री. डी.जी कोळी, यांच्या बी वार्ड कार्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील कार्यालयात जावुन त्यांची भेट घेतली असता, लोकसेवक मला म्हणाले की, **फाय फाय, कुछ कम नही है सब पेपर बराबर है, अभी अपने लोगो को भी देना पडता है, साहब लोगो को भी देना पडता है, चलो पाससौ कम करो चलो, अगली टाईम मेरे को नही चाहिये पाससौ रुपये चल** अशा प्रकारे डिजिटल व्हाईस रेकॉर्डमध्ये संभाषण ध्वनिमुदित झाले. त्यानंतर मी आणि पंच बांगर असे पायी चालत शासकीय वाहनाजवळ परत आलो. सदरचे डिजिटल व्हाईस रेकॉर्डमधील ध्वनिमुद्रित झालेले संभाषण पो. नि सुर्यवंशी यांनी पंचासमक्ष ऐकले असता, लोकसेवक कोळी यांनी लाचेची रुपये ४,५००/– रक्कमेची मागणी केल्याचे पडताळणी मध्ये स्पष्ट झाले.

त्यानंतर मी माझ्या जवळील रोख रक्कम रुपये ४,५००/– (पाचशे दराच्या नऊ भारतीय चलनी नोटा) पो. नि. सुर्यवंशी यांच्याकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्यास दिली. पो. नि. सुर्यवंशी यांनी पथकातील चालक श्री. हटकर यांना लाच रक्कमेस अॅथ्रेसिन पावडर लावून, गुणधर्म समजावुन सांगण्यास सांगितले. त्यावरुन श्री. हटकर यांनी लाच रक्कमेस अॅथ्रेसिन पावडर लावुन त्याचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर अॅथ्रेसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम मी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत पो.नि. सुर्यवंशी यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या व कारवाईचे आयोजन केले. तसेच लोकसेवक श्री. कोळी यांनी बी वार्ड (पी अॅन्ड आर) कार्यालय येथे लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने मी माझेकडील राखाडी रंगाचा मास्क तोडांवर परिधान करावा. असा पुर्वनियोजित इशारा करण्याच्या सुचना दिल्या.

तद्नंतर पो.नि. सुर्यवंशी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, पो.नि. सुर्यवंशी यांनी माझे शर्टाचे आतील बाजुस लावला. त्यानंतर मी व पंच बांगर लोकसेवक कोळी यांना भेटण्याकरीता त्यांच्या बी वॉर्ड मधील तिसऱ्या मजल्यावरील कार्यालयात गेलो. बाकीचे पथक कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने मागे–पुढे बी वार्ड मधील तिसऱ्या मजल्यावर व कार्यालयाच्या आवारात उभे राहिले. मी व पंच बांगर त्यांच्या कार्यालयातील रुम क्र. ३५ मधील रेकॉर्ड रुममध्ये गेलो असता, कोळी हे कार्यालयात मिळुन आले. मी त्याच्याशी माझ्या कामाबाबत चर्चा केली. त्यानंतर कोळी यांनी माझ्याकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली. तेव्हा मी माझ्या शर्टच्या डाव्या खिश्यातील लाचेची रक्कम माझे उजवे हाताने काढुन त्यांच्यासमोर धरली असता, कोळी यांनी लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन ती मोजली व ती लाचेची रक्कम रेकॉर्ड रुममधील रॅकवर ठेवली. त्यानतर मी व पंच रेकॉर्ड रुमच्या बाहेर

येवुन रुम नं. ३५ च्या दरवाज्या जवळ येवुन सापळा पथकास लोकसेवकांने लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्वनियोजित इशारा म्हणुन तोंडावर राखाडी रंगाचा मास्क परिधान केला. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व अमंलदार हे रुम नं. ३५ च्या दरवाजा जवळच जात असतांना तेथे लोकसेवक कोळी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. सुर्यवंशी यांनी मला लावलेला डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर पुढील कार्यावाही ला.प्र.वि, वरळी, मुंबई कार्यालयात करण्यात येणार असल्याचे तपासी अधिकारी पो. नि. सुर्यवंशी यांनी मला सांगितले.

तरी माझे बोअरवेल परवानगी मिळण्या संदर्भात केलेला अर्ज म.न.पा, बुहन्मुंबई, बी वार्ड, नियोजन आणि संशोधन विभाग (पी अॅन्ड आर), जे. जे. मार्ग, जे. जे. हॉस्पिटल समोर, मुंबई येथील डी. जी. कोळी यांचे कार्यालयात मंजुरी करीता आला. माझी बोअरवेल परवानगी मिळण्याकरीता लोकसेवक कोळी यांनी माझ्याकडे रूपये ५०००/— (रूपये पाच हजार) ची मागणी करून सदरची रक्कम दिनांक ०२/०८/२०२२ रोजी आणुन देण्यास सांगितले. दि ०२/०८/२०२२ रोजी पडताळणीचे वेळी लोकसेवक कोळी यांनी तडजोडी अंती रु. ४५००/— स्विकारण्याचे मान्य करून लाचेची रक्कम लगेचच घेवून येणास सांगितले. नमूद दिवशी म.न.पा. बी. वार्ड, नियोजन आणि संशोधन विभाग, ०३ रा माळा, जे.जे. हॉस्पीटल समोर, मुंबई येथे लोकसेवक कोळी यांनी माझे कडुन रूपये ४५००/— लाच म्हणुन स्विकारली त्यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी पंचांसह लावलेल्या सापळयात देवीदास कोळी, रेकॉर्ड असिस्टट यांनी लाचेची रक्कम स्विकारली त्याचवेळी त्यांना ताब्यात घेतले. तरी लोकसेवक कोळी यांनी माझे बोअरवेल परवानगी मिळण्याकरीता माझ्याकडे लाचेची मागणी करून ती स्विकारली म्हणून माझी त्यांच्याविरूध्द तक्रार असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा श्री. कोळी यांचेशी कोणताही आर्थीक देवाण—घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

माझी फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखित केली असून, ती मला हिंदीत/इंग्रजीत समजावुन सांगितली आहे. ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

(नाना सुर्यवंशी)
पोलीस निरीक्षक
लचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

(Avinash Nunes)

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......... तात्काळ.
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

'. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
.........................................................................................................

). (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य .........................................................
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .........................................................
Unnatural / Accidental Death Case No., if any

2. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता.वे व ठिकाणी तक्रारदार यांच्या स्वतःच्या घराच्या कंपाऊंडमध्ये बोअरवेल घेण्याकरीता मुंबई म.न.पा कार्यालय सांताक्रुझ येथे अर्ज केला होता. सदर अर्ज नियोजन व संशोधन बी.वार्ड म.न.पा मुंबई येथे पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात आला होता, सदर अर्ज वर्क मंजुरी फाईलवर अधिकाऱ्यांच्या सह्या घेवुन पुर्तता करण्याकरीता यातील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे रु. 5000/- लाचेची मागणी केली असता पडताळणीदरम्यान तडजोडीअंती 4500/- रु स्वीकारण्याचे कबुल केले. दि. 2/8/22 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे लोकसेवक यांनी फिर्यादी यांचेकडून 4500/- रु. घेतलेली लाचरक्कम स्वीकारताना रंगेहात पकडले म्हणून गु.र.क्र 33/22 कलम 7 भ्र.प्र.अ अन्वये गुन्हा नोंद.

3. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
.........................................................................................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
.........................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ................, जिल्हा ................, राज्य ................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............... No...............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................... (3) Transferred to P. S. ...............................................
District.............................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

4. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ..... नाना भागचंद सुर्यवंशी
पदनाम Rank..... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ...............

5. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख...................
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. .......................................

त, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

opy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

ttachment to item 7 of **First Information Report**